# मराठी भाषा आणि साहित्य विभाग

## वार्षिक अहवाल २०२०-२१

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ह्या कोरोना महामारीच्या वर्षात अनेक अभ्यासपूरक उपक्रम आभासी पध्दतीने राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते. मराठी वाङ्मय मंडळातर्फे, दिनांक १४/०१/२०२१ ते २८/०१/२०२१ ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी 'मराठी भाषा गौरव दिन ' आभासी पध्दतीने साजरा करण्यात आला.

- **मराठी हस्ताक्षर स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दिनांक १९/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet द्वारे करण्यात आले होते.

- **मराठी निबंधलेखन स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन बुधवार, दिनांक २०/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet द्वारे करण्यात आले होते. प्रस्तुत निबंध स्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध विद्यार्थ्यांनी लिहिले .

- **ग्रंथपरीक्षण स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन गुरुवार, दिनांक २१/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet द्वारे करण्यात आले होते.

- **काव्य रसग्रहण स्पर्धा** :

मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्य रसग्रहण स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दिनांक २२/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet द्वारे करण्यात आले होते.

- **सर्जनशील लेखन स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सर्जनशील लेखन स्पर्धेचे आयोजन शनिवार, दिनांक २३/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet द्वारे करण्यात आले होते.

- **प्रश्नमंजुषा स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन रविवार, दिनांक २४/०१/२०२१ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet आणि Google Form ह्या माध्यमाद्वारे करण्यात आले होते.

- **काव्यवाचन** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन सोमवार, दिनांक २५/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता Google Meet ह्या आभासी माध्यमाद्वारे करण्यात आले होते. प्रस्तुत काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित सर्व स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद नोंदवला.

- **संकेत संपर्क सत्र (वेबिनार)** :

इस्माईल युसूफ महाविद्यालयातर्फे आयोजित ‘साहित्य आणि इतर मानव्यविद्या शाखांमधील आंतरसंबंध’ ह्या विषयावरील वेबिनारमध्ये मराठी विषयांतर्गत ‘साहित्य आणि तत्त्वज्ञानःएक अनुबंध’ ह्या विषयावर आयोजित सत्राचे समन्वयन आणि संयोजन मराठी विभागातर्फे मंगळवार, दिनांक २३ जून २०२० रोजी करण्यात आले. ह्या सत्राला प्रमुख वक्ते म्हणून प्रा.ज्ञानेश्वर भोसले ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

- **मराठी भाषा गौरव दिन** :

मराठी विभागातर्फे शनिवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नामदेव गपाटे {सहायक प्राध्यापक(मराठी), बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी} ह्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. माधुरी

जोशी(हिंदी विभाग प्रमुख) ह्यांनी भूषविले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांची घोषणा करण्यात आली. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक डॉ. एकनाथ फुटाणे ह्यांनी केले, तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा.प्रा.समीर वैरागी ह्यांनी केले. ह्या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती वंदना, कुसुमाग्रजांवरील महितीपटाचे सादरीकरण करण्यात आले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी ‘मराठी अभिमान गीता’चे गायन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची आवर्जून ऑनलाइन उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे साहाय्य लाभले.

**सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

**मराठी विभाग प्रमुख**






महाराष्ट्र शासनाचे ‘इस्माईल युसूफ महाविद्यालय’ जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.

।। म ।। मराठी विभाग ।। म ।।

।। मराठी असे आमुची मायबोली ।।

सस्नेह निमंत्रण

मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ

आयोजित

‘मराठी भाषा गौरव दिन’

प्रमुख वक्ते

डॉ. नामदेव गपाटे

सहायक प्राध्यापक (मराठी),बनारस हिंदू विद्यापीठ,वाराणसी


दिनांक : २७ फेब्रुवारी २०२१ (शनिवार)

वेळ : सकाळी ११.०० ते ०१.००

Google Meet ची लिंक: https://meet.google.com/pgd-pzwr-vha

प्राचार्य

डॉ. स्वाती वाव्हळ



महाराष्ट्र शासनाचे ‘इस्माईल युसूफ महाविद्यालय’ जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.

।। म ।। मराठी विभाग ।। म ।।

।। मराठी असे आमुची मायबोली ।।


‘मराठी भाषा गौरव दिन’

दिनांक : २७ फेब्रुवारी २०२१ (शनिवार) वेळ : सकाळी ११.०० ते ०१.००

Google Meet ची लिंक: https://meet.google.com/pgd-pzwr-vha

कार्यक्रम पत्रिका

- सरस्वती वंदना आणि कुसुमाग्रजांच्या माहितीपटाचे सादरीकरण
- स्वागत . प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय
- ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडया’ निमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या पुरस्कारांची घोषणा आणि पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन
- प्रमुख वक्त्यांचे मनोगत
- अध्यक्षांचे मनोगत
- आभार आणि मराठी अभिमान गीताचे गायन



1

महाराष्ट्र शासनाचे 'इस्माईल युसूफ महाविद्यालय ' जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.

।। म ।। मराठी विभाग ।। म ।।

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

१४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी २०२१

दिनांक - १४/०१/२०२१

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभागातर्फे खालील उपक्रमांचे Online पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे .

| अ.क्र. | स्पर्धा / कार्यक्रम | दिनांक / वेळ | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | मराठी हस्ताक्षर स्पर्धा | १९/०१/२०२१ (मंगळवार) वेळ – सकाळी ०९. ३० ते १०. ३० वाजेपर्यंत | Google Meet |
| २ | मराठी निबंधलेखन स्पर्धा | २०/०१/२०२१ (बुधवार) वेळ – सकाळी ९. ३० ते १०. ३० वाजेपर्यंत | Google Meet |
| ३ | ग्रंथ परीक्षण स्पर्धा | २१/०१/२०२१ (गुरुवार) वेळ – सकाळी ९. ३० ते १०. ३० वाजेपर्यंत | Google Meet |
| ४ | कविता रसग्रहण स्पर्धा | २२/०१/२०२१ (शुक्रवार) वेळ – सकाळी ९. ३० ते १०. ३० वाजेपर्यंत | Google Meet |
| ५ | सर्जनशील लेखन स्पर्धा | २३/०१/२०२१ (शनिवार) वेळ – सकाळी ०९. ३० ते १० . ३० वाजेपर्यंत | Google Meet |
| ६ | प्रश्नमंजुषा स्पर्धा | २४/०१/२०२१ (रविवार) वेळ – सकाळी ०९. ३० ते १० . ३० वाजेपर्यंत | Google Meet/ Google Form |
| ७ | काव्यवाचन | २५/०१/२०२१ (सोमवार) वेळ – सकाळी ११.०० ते १२. ३० वाजेपर्यंत | Google Meet |

- **निबंधलेखन स्पर्धेसाठीचे विषय** - १. मराठी भाषेच्या संवर्धनातून विकास
  २. बोलीभाषेतून मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास
  ३. विज्ञान व तंत्रज्ञान युगात मराठी भाषेसमोरील आव्हाने व उपाययोजना
  ४. 'अमृतातेही पैजा जिंके अशी माझी मराठी'
  (कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करावे.)
- कविता रसग्रहण स्पर्धेसाठीची कविता -कवितेचे शीर्षक - मायबोली ;कवी –सुरेश भट
- सर्जनशील लेखन स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी कोणत्याही विषयावरील स्वरचितकथा किंवा कवितेचे लेखन करावे.

(**टीप** - १. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्व कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभागी व्हावे.)

।।मराठी असे आमुची मायबोली।।

## मराठी विभागातील शिक्षकांची आणि माजी विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपलब्धी (शै. वर्ष २०२०-२१)

- **सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी –**
  १. कोरोना टाळेबंदीच्या काळात एकूण ७९ संकेत संपर्क सत्रात(वेबिनार) दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग नोंदवला.
  २. सुमारे १६ शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात (FDP) दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग.
  ३. संस्कृत संभाषण कार्यशाळा, मराठी विकिपीडिया परिचयात्मक कार्यशाळा, ब्राम्ही लिपी प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यासक्रम कार्यशाळा इत्यादी कार्यशाळांमध्ये सहभाग.
  ४. विद्यापीठ अनुदान आयोग आणि मानव संसाधन केंद्र(UGC-HRDC), गुजरात विद्यापीठ ह्यांचा 'E-Content Development' ह्या विषयातील लघु मुदतीचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. (कालावधी-२८/०५/२०२० ते ०३/०६/२०२०)
  ५. इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ह्यांच्या वतीने आयोजित 'मोडी लिपी आणि कागदपत्रे' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम 'अ+' प्राप्त करून एप्रिल-२०२१ मध्ये यशस्वीरित्या पूर्ण केला.
  ६. पी. एल. श्रॉफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी (पालघर) येथील 'स्पर्धा परीक्षा केंद्रा' त मार्गदर्शनपर व्याख्यान.
  ७. विविध वाङ्मयीन नियतकालिकांमध्ये 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले', 'संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांतील तत्त्वज्ञान' इत्यादी शोधनिबंधांचे लेखन तसेच अनुदिनीलेखन(ब्लॉग).
  ८. ज्ञानार्णव प्रकाशनाकडून डिसेंबर २०२० मध्ये 'पांढर : एक आकलन' ह्या पुस्तकाचे प्रकाशन.
- प्रा.सारिका पांडुरंग जगताप, श्री.इरफान कादर शेख, कु.दिशा पाटील, कु.रोहिणी डफळे हे विद्यार्थी मुंबई विद्यापीठातून मराठी विषयात 'विद्या निष्णात' (एम.ए.) ही पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.
- कु.साईली सहदेव यादव, कु.राकेश नारायण मोरे,कु.ऐश्वर्या बारे ह्या विद्यार्थ्यांचा मुंबई विद्यापीठात मराठी विषयात 'विद्या निष्णात' (एम.ए.) ह्या पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश.

मराठी भाषा आमुची जोरदार खाशी !
भले हो जोमदार खाशी !!
हुरूप देऊनी आम्हां !
मिळविले वैरी तिने धुळीशी
पूर्णत्वाला संस्कृत भाषा गेली तितुन
उच्चाराच्या सुलभपणास्तव प्राकृत जन्मुन
तीहुन सोप्या उच्चाराची परी आवेशाची
निघे मराठी प्रशस्त भाषा महारठ्याची !!

**महात्मा जोतिबा फुले**

ज्ञानियाची कुणी काढा बरे तीट
मराठीचा थाटा संसार हो नीट
अमृताते पुन्हा पैंज मी लावीन
थोर भल्या भल्या क्षणांत जिंकीन

**नारायण सुर्वे**

हे पुण्यपावन मराठी !
आइकती आदरें कर्णपुटी !
तेयासी कव्हनी न पडें कामाठी !
संसाराची !!

**कवी नरेंद्र**

- **'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा ' अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल (१४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी २०२१)**

१. **मराठी हस्ताक्षर स्पर्धा** (दिनांक:१९ जानेवारी २०२१)
कु. लता कैलास सुरवाडे – द्वितीय वर्ष कला

२. **मराठी निबंधलेखन स्पर्धा** (दिनांक:२० जानेवारी २०२१)
कु. शिवराज  लक्ष्मण रायगोंडे – तृतीय वर्ष कला

३. **ग्रंथपरीक्षण स्पर्धा** (दिनांक:२१जानेवारी २०२१)
कु. शिवराज  लक्ष्मण रायगोंडे – तृतीय वर्ष कला

४. **कविता रसग्रहण स्पर्धा** (दिनांक:२२जानेवारी २०२१)
प्रथम क्रमांक - कु.तेजल राज सिंग– प्रथम वर्ष कला
द्वितीय क्रमांक - कु. सुषमा दिलीप दाखले – प्रथम वर्ष कला

५. **सर्जनशील लेखन स्पर्धा** (दिनांक: २३ जानेवारी २०२१)
कु. बुद्धभूषण गोपाळ भगत – प्रथम वर्ष कला

६. **प्रश्नमंजुषा स्पर्धा** (दिनांक: २४ जानेवारी २०२१)
कु. अमृता शिवमूर्ती कांबळे – प्रथम वर्ष कला

७. **काव्यवाचन स्पर्धा** (दिनांक: २५ जानेवारी २०२१)
प्रथम क्रमांक – कु. स्वप्नाली नरेंद्र आडिवरेकर – द्वितीय वर्ष कला
द्वितीय क्रमांक - श्रीमती शबाना हुसेन शेख – तृतीय वर्ष कला

- **तृतीय वर्ष कला (मराठी) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी ( शैक्षणिक वर्ष २०१९-२० )**

- **प्रथम क्रमांक** - कु. साईली सहदेव यादव
- **द्वितीय क्रमांक** - कु. स्नेहल विजय कलमष्टे
- **तृतीय क्रमांक** - कु. राकेश नारायण मोरे

